# रेल्वे प्रवासाविषयी

**यशोधन ट्रॅव्हल्स्...**

हिंडाव.. फिरावं.. मस्त मजेत जग पहावं...

### अत्यंत महत्त्वाचे निवेदन

रेल्वे/विमान प्रशासनावर आमची कोणतीही मालकी / ताबा /अधिकार नाही. त्यामुळे त्यांच्या व्यवस्थापनातील त्रुटींमुळे सभासदांची कोणत्याही प्रकारची जिवीतहानी/वित्तहानी/गैरसोय झाली तर त्यास यशोधन ट्रॅव्हल्स् जबाबदार असणार नाही.

✻ कोणत्याही कारणास्तव सभासद रेल्वे स्टेशनवर उशीरा पोहोचले किंवा पहिल्या प्रवासातील रेल्वे निर्धारित वेळेपेक्षा उशीरा पोहोचली व त्यामुळे पुढची कनेक्टेड ट्रेन किंवा विमान निघुन गेले व त्यामुळे सभासदांची ऐनवेळेस काही गैरसोय झाली तर त्यास यशोधन ट्रॅव्हलस् जबाबदार असणार नाही. निघून गेलेल्या ट्रेन /विमानाच्या तिकीटाची किंमत (संपूर्ण / निम्मी / त्याचा कोणताही हिस्सा) यशोधन ट्रॅव्हल्स्कडून परत मिळणार नाही. अशावेळी पर्यायी ट्रेन किंवा विमानाचे तिकीट काढण्यासाठी लागणारे तिकीट भाडे सभासदांनीच द्यावयाचे आहे. अशावेळी मुक्काम करावा लागला तर मुक्कामाच्या हॉटेलचे व भोजनादी व्यवस्थांचे पैसे सभासदांनीच द्यावयाचे आहेत.

### रेल्वे तिकीटाविषयी

०१) यशोधन ट्रॅव्हल्स्च्या कोणत्याही सहलीच्या शुल्कात रेल्वे अथवा विमान प्रवास भाड्याचा समावेश केलेला नाही.

०२) रेल्वे प्रवासाचे बुकींग प्रत्यक्ष प्रवासाचा दिवस सोडून १२० दिवस आधी सुरु होते.

०३) कम्प्युटराईज्ड रेल्वे रिझर्व्हेशन पद्धतीमुळे कोणत्याही ट्रेनचे अथवा कोणत्याही क्लासचे तिकीट संपूर्ण भारतात काढले जाते.

०४) रेल्वे रिझर्व्हेशन कम्प्युटराईज्ड पद्धतीने होत असल्यामुळे खालचा, मधला, वरचा, साईडचा अथवा विशिष्ट नंबरचाच बर्थ आपणास मिळेल याची कोणतीही खात्री नसते. अशावेळी आपणास मिळेल त्या बर्थवरुनच प्रवास करावा लागतो.

०५ सभासद रेल्वेची तिकीटे घरात बसून कॉम्प्युटरवर ु.ळीलींल.ळप या वेबसाईटवरुन / काऊंटरला स्वतः जाऊन / स्वतःच्या एजंटकडून काढू शकतात.

०६) रेल्वे प्रवासातील चहा नास्ता, भोजन, पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर व सामानाची वाहतुक यांची जबाबदारी व खर्च सभासदांचाच राहील.

### सिनियर सिटीझन सवलत

०१) सिनियर सिटीझन या संज्ञेत रेल्वे प्रवासात वय ५८ वर्षे पूर्ण असणाऱ्या महिलांना ५०% सवलत मिळते वय ६० वर्षेपूर्ण असणाऱ्या पुरुषांना ४०% सवलत मिळते.

०२) ५ ते ११ वयोगटातील मुलामुलींना सुद्धा ५०% सवलत मिळते. अशा सभासदांनी सवलतीचा फायदा हवा असल्यास वयाचा पुरावा प्रवासादरम्यान (ओरिजनल) जवळ बाळगणे आवश्यक आहे. पुरावा नसल्यास दंडात्मक कारवाई झाली तर दंड सभासदांना भरावा लागेल.

### रेल्वेची तत्काल तिकीट सेवा

०१) रेल्वेकडील तिकीटे संपल्यानंतर जे सभासद सहल बुक करतात अशा सभासदांना तत्काल तिकीटाचा पर्याय स्वीकारावा लागतो. यात कंपनीचा दोष नसतो.

०२) तत्काल सेवेअंतर्गत प्रत्यक्ष प्रवासाच्या २४ तास आधी रेल्वेचे तत्काल तिकीट मिळते.

०३) तत्कालच्या रिझर्वेशन फॉर्ममध्ये फक्त ४ जणांची नावे टाकता येतात.

०४) तत्काल तिकीटामध्ये सिनिअर सिटीझन अथवा कुठल्याही प्रकारची सवलत मिळत नाही. उलट रेल्वे प्रत्येक तिकीटावर अतिरिक्त चार्ज आकारुनच तिकीटे देते. त्यामुळे नॉर्मल तिकीटापेक्षा तत्काल तिकीटाची किंमत जास्त असते.

०५) तत्काल तिकीट काढण्यासाठी प्रवास करणाऱ्या सभासदांना स्वतः रेल्वे स्टेशनवर जाऊन तिकीट काढावे लागते.

०६) तत्कालची तिकीटे अत्यल्प असतात. तत्कालमध्ये ज्या क्लासचे व ज्या ट्रेनचे तिकीट काढावयाचे आहे ते जर प्रयत्न करुनही मिळाले नाही तर मिळालेल्या तिकीटावरुनच प्रवास करावा लागतो.

०७) तत्कालचे तिकीट काढताना स्वतःचे ओळखपत्र (पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, इलेक्शन ओळखपत्र) यापैकी एकाची झेरॉक्स कॉपी तिकीट काढताना रेल्वे काऊंटरवर द्यावी लागते. तसेच प्रत्यक्ष प्रवासात झेरॉक्स प्रतिची ओरिजनल कॉपी जवळ बाळगणे अत्यावश्यक आहे. अन्यथा रेल्वे प्रवासात टी.सी. कडून होणाऱ्या दंडास सभासद जबाबदार राहतील. यात कंपनीचा काहीही संबंध नसतो.

रेल्वेचे नॉर्मल किंवा तत्काल सेवेतील तिकीट जर वेटींग मधे असेल तर असे तिकीट कन्फर्म झाले किंवा नाही याबाबत रेल्वे सुटण्याआधी एक ते दोन तास अधिकृत माहिती मिळते. रेल्वेच्या तिकीटांच्या कन्फर्मेशनची जबाबदारी यशोधन ट्रॅव्हलची नाही. आपणास उत्तम सहल देणे ही आमची जबाबदारी आहे.

कन्फर्म रेल्वे रिझर्व्हेशनसाठी सहल निघण्याच्या १२५ दिवस आधी सहल बुक करणे अत्यावश्यक आहे.रेल्वे प्रवासात प्रत्येक सभासदांकडे व्हॅलीड फोटो आय डी म्हणजेच निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट ड्रायव्हिंग लायसन्स, पॅनकार्ड आदि ओरिजनल स्वरुपात असणे अत्यावश्यक आहे.

**सहल बुक करणाऱ्या प्रत्येक सभासदाने वरील सर्व माहिती वाचली असून ती त्यांना समजलेली आहे व मान्य आहे असे कंपनीकडून गृहीत धरले जाते.**





# विमान प्रवासाविषयी

## अत्यंत महत्त्वाचे निवेदन

**पिक अप ड्रॉप व्यवस्था -** विमानाने सहलीस येणाऱ्या व जाणाऱ्या सभासदांसाठी विमानतळावर पिकअप करण्याची तसेच विमानतळावर ड्रॉप करण्याची व्यवस्था केली जाईल. मात्र यासाठीचा खर्च सभासदांनीच द्यावयाचा आहे. याची नोंद घ्यावी.

✻ विमान कंपन्यांच्या प्रशासनावर आमची कोणतीही मालकी / ताबा / अधिकार नाही. त्यामुळे त्यांच्या व्यवस्थापनातील त्रुटींमुळे सभासदांची कोणत्याही प्रकारची जिवीत / वित्तहानी / गैरसोय झाली तर त्यास यशोधन ट्रॅव्हल्स् जबाबदार असणार नाही.

✻ कोणत्याही कारणास्तव सभासद विमानतळावर उशीरा पोहोचले किंवा विमान निर्धारित वेळेपेक्षा लवकर निघाले किंवा निर्धारित वेळेपेक्षा उशीरा पोहोचले व त्यामुळे पुढची कनेक्टेड ट्रेन किंवा विमान निघून गेले व त्यामुळे सभासदांची ऐनवेळेस काही गैरसोय झाली तर त्यास यशोधन ट्रॅव्हल्स् जबबादार असणार नाही. निघुन गेलेल्या ट्रेन/ विमानाच्या तिकीटाची किंमत (संपूर्ण / निम्मी / त्याचा कोणताही हिस्सा) यशोधन ट्रॅव्हलकडून परत मिळणार नाही. अशावेळी पर्यायी ट्रेन किंवा विमानाचे तिकीट काढण्यासाठी लागणारे तिकीट भाडे सभासदांनीच द्यावयाचे आहे. अशावेळी मुक्काम करावा लागला तर मुक्कामाच्या हॉटेलचे व भोजनादी व्यवस्थांचे पैसे सभासदांनीच द्यावयाचे आहेत. वरील गोष्टींची सभासदांना पुर्ण माहिती आहे असे गृहित धरुनच सभासदांचे सहलीसाठी बुकींग घेतले जाते.

०१) यशोधन ट्रॅव्हल्सच्या कोणत्याही सहलीच्या सहल शुल्कात विमान प्रवासाच्या तिकीटाच्या किंमतीचा समावेश केलेला नसतो. फक्त नेपाळ २० दिवस या सहलीत नेपाळ देशातील अंतर्गत (भद्रपुर ते काठमांडू) या विमान प्रवासाच्या तिकीटाचा सहल शुल्कात समावेश केलेला आहे.

०२) विमानाची तिकीटे ऑनलाईन पद्धतीने बुक केली जातात. त्यामुळे तिकीटांच्या किंमतीत सतत बदल होत असतो. अशावेळी आम्ही आपणास सांगितलेली तिकीटांची किंमत व प्रत्यक्षात तिकीटाची प्रिंट हाती पडल्यानंतर त्यावर आलेली किंमत यात जर फरक पडला तर अशा फरकाची रक्कम आपणास सहलीपूर्वीच द्यावयाची आहे.

०३) विमान प्रवासाच्या वेळेत जर काही बदल होणार असतील तर अशा प्रकारच्या सूचना आपणांस विमान कंपनीकडून सभासदांनी संमतीपत्रकात दिलेल्या मोबाईलवर दिल्या जातात.

०४) आपल्या सहलीच्या निर्धारित कार्यक्रमपत्रिकेनुसार आपली विमानाची तिकीटे काढून दिली जातात, परंतु विमानाच्या वेळेत जर बदल झाला व त्यामुळे विमानतळावर लवकर अथवा उशिरा जावे लागले, सहलीच्या आधी किंवा नंतर एखादा जास्तीचा मुक्काम घ्यावा लागला तर अशावेळी होणारा जास्तीचा खर्च सभासदांनाच करावयाचा आहे. आम्ही फक्त विमानाची तिकीटे काढतो. वेळेतील बदल विमान कंपनी आम्हाला कळवत नाही. अशा बदलांचे मेसेज सभासदांना त्यांच्या मोबाईलवर विमान कंपनी मार्फत कळविले जातात. असा आलेला मेसेज आपण आम्हांला सांगितला तर आम्ही आपणांस योग्य ती मदत करतो.

०५) यशोधन ट्रॅव्हलसकडून आपण विमान प्रवासाचे तिकीट बुक करु शकता. तिकीटावर कोणताही चार्ज आकारला जात नाही. सभासद स्वतः देखील विमानाची तिकीटे बुक करु शकतात.

०६) विमान प्रवासात प्रत्येक सभासदास १५ किलोपर्यंत सामान घेवून जाता येते. त्यापेक्षा जास्त सामान झाल्यास विमान कंपनीच्या नियमाप्रमाणे सभासदांना सामान शुल्क भरावे लागेल.



विमान प्रवासात प्रत्येक सभासदाकडे व्हॅलीड फोटो आयडी म्हणजेच निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट, आधारकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, आदी ओरिजनल स्वरुपात असणे अत्यावश्यक आहे.

सहल बुक करणाऱ्या प्रत्येक सभासदाने वरील सर्व माहिती वाचली असून ती त्यांना समजलेली आहे व मान्य आहे असे कंपनीकडून गृहीत धरले जाते.

# बस प्रवासाविषयी

**यशोधन ट्रॅव्हल्स्...**

हिंडाव.. फिरावं.. मस्त मजेत जग पहावं...



अत्यंत महत्त्वाचे निवेदन

०१) यशोधन ट्रॅव्हल्सच्या सर्व सहलींमध्ये स्थानिक बस मालकांमार्फत बसेसची व्यवस्था केली जाते.

०२) बसेसची आसन क्षमता साधारणपणे १९, २२, २७, ३५, ४२ सिट्स अशी असते.

०३) सर्व सहलींकरीता बसमधील जागा प्रथम बुक करणाऱ्यास प्रथम या तत्वावर दिल्या जातात.

०४) रोटेशन पद्धत नाही.

०५) बसमधील पुढील सीटस्साठी पत्रक हाती पडताच त्वरेने निर्णय घेऊन आपले सिट बुक करणे हाच एक पर्याय आहे.

०६) काही सभासद उशीरा सहल बुक करतात व बसमधील पुढील सीटस् मिळाव्यात म्हणून टुर लिडरकडे आग्रह धरतात, कृपया अशी गळ घालू नये ही नम्र विनंती.

०७) आपण सर्व सहलींकरीता पुश बॅक / हाय बॅक सीटस् असणारी आरामदायी ३२ आसनव्यवस्था असणारी बस व्यवस्था करतो.

०८) सभासद संख्या कमी असल्यास सहलीमध्ये ट्रॅव्हलर, सुमो, क्वालिस अशा छोट्या वाहनांची व्यवस्था केली जाते.

०९) ज्या सहलीत एसी बस व्यवस्था दिलेली असते त्याबाबतीत माहिती पत्रकात तसेच सहल बुकींगच्या वेळेस त्याची पुर्व कल्पना दिली जाते. अन्यथा सहलीत नॉन ए.सी. ३२ आसन व्यवस्था असलेल्या सेमी लक्झरी बसेस असतात. ए.सी. बस व्यवस्था असेल तरीही डोंगराळ / पहाडी ठिकाणी ए.सी. चालविला जात नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१०) वय वर्ष ५ पेक्षा कमी वय असणाऱ्या मुलांना बस प्रवासात स्वतंत्र सीट दिली जाणार नाही. मात्र अशा मुलांना सहल शुल्क म्हणुन १०% रक्कम द्यावी लागेल.

११) ज्या शहरात मोठ्या बसने साईटसीन करणे शक्य नसते तेथे लहान जीप / सुमो / क्वॉलीस अशा वाहनातून ७ ते ८ सभासदांना एकत्र बसवून साईटसीन पूर्ण केले जाते. अशी वाहने नॉन. ए.सी. असतात. काही सहलीत रिक्षाने साईट सीन पूर्ण केले जाते.

**सहल बुक करणाऱ्या प्रत्येक सभासदाने वरील सर्व माहिती वाचली असून ती त्यांना समजलेली आहे व मान्य आहे असे कंपनीकडून गृहीत धरले जाते.**



# हॉटेल व्यवस्था





सहल बुक करणाऱ्या प्रत्येक सभासदाने वरील सर्व माहिती वाचली असून ती त्यांना समजलेली आहे व मान्य आहे असे कंपनीकडून गृहीत धरले जाते.

## अत्यंत महत्त्वाचे निवेदन

सहलीत सर्वांनाच उत्तम हॉटेल व्यवस्था अपेक्षित असते. कारण आराम हा हॉटेलचा मुख्य हेतू असतो. त्यामुळे यशोधन ट्रॅव्हल्सने सर्वच सहलींमध्ये सभासदांना उत्तम दर्जेदार अशी हॉटेल व्यवस्था दिलेली आहे. सर्व सुखसोयींनी युक्त ॲटॅच्ड टॉयलेट, बाथरुम आदि बाबींनी परिपूर्ण अशा रुम्स सभासदांना हॉटेल वास्तव्यात प्रत्येकी दोन व्यक्ती / फॅमिली मागे एक अशाप्रकारे दिल्या जातात.

०१) आम्ही आपणास उत्तम दर्जाचे हॉटेल वास्तव्य देतो. आम्ही आपणास कोणत्याही स्टार कॅटेगिरीच्या हॉटेल्सची कमिटमेंट देत नाही. आरामदायी, उत्तम हॉटेल व्यवस्था मात्र निश्चित देतो.

०२) १ ते ४ वयोगटातील मुलांकरिता सहल शुल्क भरावे लागणार नाही. अशा मुलांना निवास व्यवस्था, बस प्रवास, रेल्वे प्रवास यामध्ये स्वतंत्र सीट अथवा बेड दिला जाणार नाही. विमान प्रवासाकरीता मात्र पूर्ण रकमेचे तिकीट घ्यावे लागेल. भोजन व्यवस्था सर्व सभासदांप्रमाणे मिळतील.

०३) ५ ते ११ वयोगटातील मुलांना सहल शुल्कात निवडलेल्या सहलीप्रमाणे रु. १०००/- ते ४०००/- पर्यंत सवलत दिली जाईल. तसेच हॉटेल वास्तव्यात अशा फॅमिलीस ट्रिपल बेडरुम उपलब्ध असल्यास प्राधान्याने दिली जाईल. अन्यथा त्याच रुममध्ये गादी, उशी, पांघरुणासह जमिनीवर एक्स्ट्रा बेडची व्यवस्था करुन दिली जाईल. स्वतंत्र कॉट दिली जाणार नाही.

०४) एकटे सभासद जे एकट्याने सहल करु इच्छितात त्यांना दुसऱ्या एकट्याने प्रवास करणाऱ्या सभासदाबरोबर हॉटेलच्या रुममध्ये रहावे लागेल. रुम पार्टनर मिळाला नाही तर स्वतंत्र रुमसाठी सहल खर्चाच्या ३५% जादा रक्कम द्यावी लागेल.

०५) ज्या सहलीत ज्या मुक्कामाच्या ठिकाणी ए,सी. हॉटेलचे कमिटमेंट दिलेले आहे तिथे ए.सी. रुम्स दिल्या जातात. अन्यथा सर्वत्र नॉन ए.सी. रुम्स दिल्या जातात. सभासद स्वखर्चाने ए.सी. रुम्सचा फरक देऊन तशी व्यवस्था घेऊ शकतात.

०६) यशोधन ट्रॅव्हल्स्ने वर दिल्याप्रमाणे सर्व हॉटेलमध्ये सहलीतील रुम्सचे कन्फर्म बुकींग केलेले आहे. परंतु कधी कधी हॉटेलच्या व्यवस्थापनाकडून त्यांच्यापुढे अचानकपणे उद्‌भवलेल्या अडचणींमुळे ऐनवेळेस काही रुम्सचे बुकींग अन्य हॉटेल्स्मध्ये हस्तांतरित केले जाते. सिझन मधील टूर्सच्या बाबतीत हा प्रॉब्लेम येण्याची शक्यता असते. अशावेळी बदलेल्या हॉटेलमधील रुम्स्मध्ये आपल्या ग्रुपमधील काही सभासदांना शिफ्ट करावे लागते. यामध्ये यशोधन ट्रॅव्हल्स्चा काहीही दोष नसतो. अशावेळी कोणताही गैरसमज करुन घेऊ नये.

०७) काही सभासदांना मोठी रुम मिळाली किंवा फ्रन्टची तसेच व्ह्यू असणारी रुम मिळाली म्हणून काही सभासद नाराज होतात किंवा तक्रार करतात. कृपया असे करु नये. त्याची दखल घेणे किंवा दुरुस्ती करणे शक्य नसते.

# भोजन व्यवस्था



**भोजन व्यवस्थेविषयी सविस्तर माहिती**

सर्वत्र चांगल्या हॉटेल्समध्ये आपली निवास व्यवस्था असते. हॉटेलमधील किचनाचा वापर करुन आपले आचारी तेथे स्वयंपाक करतात. त्यामुळे दररोज मुक्कामाच्या ठिकाणी आमचे आचाऱ्यांकरवी तयार केलेला १ वेळ नाश्ता, २ वेळ शुद्ध शाकाहारी रुचकर भोजन, ३ वेळा चहा अथवा कॉफी, दररोज १ वेळ स्वीट डीश अशा प्रकारची भोजन व्यवस्था आपणास दिली जाते. पूर्वकल्पना दिल्यास उपवासाच्या पदार्थांची व्यवस्था केली जाते. मधल्या वेळचा खाऊ दिला जातो. पिण्यासाठी पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर दिले जाते.

०१) पहाटे ५ ते ६ चे दरम्यान रुममध्ये बेड टी दिला जातो.

०२) सकाळी साधारण ७ ते ८ च्या दरम्यान आपणास नाश्ता तसेच चहा किंवा कॉफी दिली जाते.

०३) दुपारी १ चे दरम्यान व रात्री मुक्कामी पोहचल्यावर ८ ते ९ चे दरम्यान भोजन दिले जाते. यात दोन भाज्या, वरण - भात, लोणचे, पापड, कोशिंबीर, पोळी, फुलके. चपाती, पावभाजी असे पदार्थ दिले जातात.

०४) दररोज एका वेळच्या जेवणात स्वीट डिश दिली जाते.

०५) दुपारी ४ ते ५ चे दरम्यान चहा/ कॉफी दिली जाते. नाश्ता व भोजन अमर्याद असते.

०६) दिवसभरात प्रत्येक सभासदास ३ लिटर पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर दिले जाते.

०७) ज्या सहली पुण्याऐवजी बाहेर गावावरुन सुरु होतात किंवा संपतात त्या सहलीत आम्ही जाणे येणेसाठी पुणे येथून फक्त बसची सोय करतो. अशा प्रवासातील चहा, नाश्ता, भोजन, बिसलेरी यांची व्यवस्था स्वखर्चाने करावी लागेल.

०८) यशोधन ट्रॅव्हल्स्ची भोजन व्यवस्था सर्व सहलींमध्ये रेल्वेतून उतरल्यानंतर पहिल्या दिवशीच्या मुक्कामाच्या हॉटेलपासून सुरु होते व शेवटच्या दिवशीच्या मुक्कामाच्या हॉटेलला पूर्ण होते. ज्या सहलीत अपेक्षेपेक्षा कमी सभासद असतात. अशा सहलीत आमचे किचन युनिट नसते. अशा वेळी हॉटेल फुड दिले जाते.

०९) रेल्वे / विमान प्रवासातील तसेच रेल्वे / विमानातून उतरल्यांनतर पहिल्या मुक्कामाच्या हॉटेलला येईपर्यंत किंवा सहल पुर्ण झाल्यांनतर शेवटच्या मुक्कामाच्या हॉटेलपासून रेल्वे स्टेशन / विमानतळावर जाण्यापर्यंतचा चहा / नाश्ता / भोजन / पिण्याचे पाणी यांचा खर्च सभासदांनी स्वतः करावयाचा आहे.

१०) सहल पूर्ण झाल्यानंतर परतीचा रेल्वे / विमान प्रवास सायंकाळी किंवा रात्री सुरु होत असल्यास यशोधनची भोजन व्यवस्था दुपारपर्यंतच असते. त्यापुढील भोजन व्यवस्थेचा खर्च सभासदांनी स्वतः करावयाचा आहे.

११) चहा, नाश्ता, भोजन, पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर तसेच मधल्या वेळचा खाऊ यांचा दर्जा उत्तमच ठेवला जातो.

१२) सहलीत पथ्य असणाऱ्या सभासदांना शक्यतोवर त्यांना अपेक्षित असणारी भोजन व्यवस्था देण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु वेळे अभावी अशी व्यवस्था देणे शक्य नसल्यास उपलब्ध भोजन व्यवस्थाच घ्यावी लागेल. बिनसाखरेची मिठाई सहलीत देऊ शकत नाही.






सहल बुक करणाऱ्या प्रत्येक सभासदाने वरील सर्व माहिती वाचली असून ती त्यांना समजलेली आहे व मान्य आहे असे कंपनीकडून गृहीत धरले जाते.



# आवर्जुन लक्षात ठेवाच

आपली सहल उत्तम आणि संस्मरणीय व्हावी यासाठी यशोधनने सहलीतील सर्व व्यवस्थांचे सुयोग्य नियोजन केलेले आहे. सहल बुक करणाऱ्या प्रत्येक सभासदाने माहिती पत्रकातील सहलीचा दिनवार कार्यक्रम, भोजन व्यवस्था, हॉटेल व्यवस्था, सामान वाहतुक व्यवस्था, सहल कॅन्सलेशन पॉलिसी, सहल शुल्कात समाविष्ट असणाऱ्या / नसणाऱ्या बाबी, नियम, अटी, मार्गदर्शन तसेच सभासदांनी प्रत्यक्ष सहलीत करावयाच्या प्रासंगिक खर्चाचा तपशील, रेल्वे व विमानप्रवासातील स्वतःच्या तिकिटाची वस्तुस्थिती इ. बाबी कंपनीकडुन समजावुन घेतलेल्या आहेत व त्या सभासदास संपूर्णपणे मान्य आहेत असे कंपनीकडून गृहित धरले जाते. काही सभासद वरील माहीतीची खातरजमा न करताच किंवा प्रत्यक्ष ऑफिसला न येता हस्ते पर हस्ते सहलीची संपुर्ण माहिती न घेता किंवा फोनवरच सहल बुक करतात. ते टाळण्यासाठी आपल्या मनातील शंका, प्रश्न यांचे कंपनीकडून सहल निघण्यापुर्वीच निरसन करुन घ्या. आपले शंका निरसन केले जाईल. नंतर प्रत्यक्ष सहलीमध्ये किंवा सहल पूर्ण झाल्यानंतर ऑफिसमध्ये येऊन केलेल्या कोणत्याही (लेखी/तोंडी) तक्रारीची दखल घेणे शक्य होणार नाही. सर्व सभासदांची सहल आनंददायी व्हावी या एकमेव हेतुने वरील सर्व गोष्टी सविस्तरपणे सांगाव्या लागत आहेत.

### प्रासंगिक खर्च

- प्रासंगिक खर्च म्हणजे उदा. प्रवेश फी असणारी पर्यटन स्थळे, किल्ले, राजवाडे, राजमहाल, मंदिरे, म्युझियम, झू, गार्डन्स, आर्ट गॅलरी, फिल्मसिटी, बोटींग, नेपाळ सहलीतील एअरपोर्ट टॅक्स, कस्टम ड्युटी, रोपवे, शॉपिंगसाठीचे वाहन, सभासदांनी स्वतंत्रपणे फिरण्यासाठी केलेले वाहन यासाठीचा खर्च वैयक्तिक रित्या करावयाचा आहे. सहल शुल्कात या खर्चाचा समावेश केलेला नसतो.
- सहलीची बस ज्या ठिकाणी जाऊ शकत नाही अशा ठिकाणी जाण्यायेण्यासाठी लागणारी वाहने उदा. पाण्यातील प्रवासासाठी नाव, जहाज, बोट, उंटावरील सफारी, हत्तीवरील सफारी, जिप सफारी, उंटगाडी, जंगल सफारीतील जिप्सी, घोडा, डोली, दंडी, कंडी, हेलिकॉप्टर यासाठीचा खर्च सभासदांनी वैयक्तिक रित्या करावयाचा आहे. सहल शुल्कात या खर्चाचा समावेश केलेला नसतो.
- सहल बुक करताना तसेच गेट टुगेदरच्या वेळेस सहलीनुसार प्रासंगिक खर्च तोंडी / लेखी अंदाजे किती असेल याची पुर्व कल्पना दिली जाते.

### सहल व्यवस्था

सहल यशस्वी करण्यासाठी कंपनीचा सेवक वर्ग, सहल व्यवस्थापक किचन युनिट सहली सोबत असतात. आवश्यक तिथे स्थानिक गाईड सोबत घेतले जातात. ग्रुप मर्यादित असतो. प्रत्येकाकडे व्यक्तिगत लक्ष दिले जाते. यशोधन ट्रॅव्हलची प्रत्येक सहल सहलीतील पहिल्या मुक्कामाच्या हॉटेलला सुरु होते व शेवटच्या मुक्कामाच्या हॉटेलला पुर्ण होते.

### पिक अप ड्रॉप व्यवस्था

- विमानाने सहलीस येणाऱ्या व जाणाऱ्या सभासदांसाठी विमानतळावर पिकअप करण्याची तसेच विमानतळावर ड्रॉप करण्याची व्यवस्था केली जाईल. मात्र यासाठीचा खर्च सभासदांनीच द्यावयाचा आहे. याची नोंद घ्यावी

### सामान वाहतुक

- यशोधन ट्रॅव्हल्सतर्फे सहल कालावधीत सभासदांच्या सामानाची/लगेजची वाहतुक (पुणे रेल्वे स्टेशनवरील जाताना ची व येतानाची वाहतुक वगळता) संबंधीत सहलीतील सर्व रेल्वे स्टेशनवरील, तसेच सहलीतील बस प्रवासातील व हॉटेल वास्तव्यातील यशोधन ट्रॅव्हल्सतर्फे केली जाईल. पुणे स्टेशन वगळता सभासदांना कुठेही सामानाची वाहतुक करावी लागणार नाही. मात्र रेल्वे स्टेशनवरील सामानाची कुलीमार्फत वाहतुक होत असताना सहलीतील संबंधीत सभासदांनी आपले सर्व सामान / लगेज बसमधे अथवा टुर लिडरने सांगितलेल्या ठिकाणी पोहचेपर्यंत सामानावर लक्ष ठेवून सोबत जाणे अत्यावश्यक आहे. या वाहतुकीत सामानाचे नुकसान झाले अथवा सामान गहाळ झाले तर त्यास कंपनी जबाबदार असणार नाही. याची कृपया नोंद घेऊन स्वतः सतर्क रहावे.

सहल शुल्क पाठविण्यासाठी यशोधन ट्रॅव्हल्स् प्रा. लि. च्या बँक डिटेल्स्

**Account Name - Yashodhan Travels Pvt. Ltd.**

| Bank Name | Account No. | IFSC Code |
|---|---|---|
| Bank of Maharashtra | 60091222645 | MAHB 0000322 |
| HDFC | 17912560000254 | HDFC 0001791 |
| State Bank of India | 32185096237 | SBIN 0010473 |

शुभ यात्रा

